


दैनिक **अक्षराज**
अचूक वेध,अचूक बातमी
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध
Email : newsaksharaj2021@gmail.com

**आजचा सुविचार**

तारुण्याचा जोम अंगी आहे
तोवरच कोणतीही गोष्ट शक्य होईल
कार्याला लागण्याची अत्यंत
उचित अशी हीच वेळ आहे.
– स्वामी विवेकानंद

वर्ष : ०५ | अंक : ८४, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, शुक्रवार, दि.०७ नोव्हेंबर २०२५ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056

# पार्थ पवार यांच्या कंपनीवर गुन्हा दाखल होणार...

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०६, पुणे :** राज्याच्या राजकारणात एका नव्या प्रकरणामुळे खळबळ उडाली आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे ज्येष्ठ पुत्र पार्थ पवार यांच्यावर अतिशय गंभीर स्वरुपाचे आरोप करण्यात आले आहेत. पार्थ पवार यांच्या मालकीची अमेडिया होल्डिंग्स एलएलपी या कंपनीने पुण्यातील हायप्रोफाईल अशा कोरेगाव आयटी पार्क परिसरातील ४० एकर सरकारी जमीन कमी किंमतीत खरेदी केल्याचा आरोप करण्यात आला आहे. विशेष म्हणजे या जमिनीची किंमत १८०० कोटी रुपये इतकी होती. पण पार्थ पवार यांच्या कंपनीने ही जमीन अवघ्या ३०० कोटी रुपयांना खरेदी केल्याचा आरोप करण्यात आला आहे. इतक्या किंमतीत जमीन खरेदी केली तरी केवळ ५०० रुपये स्टॅम्प ड्युटी



भरल्याचा आरोप करण्यात आला आहे. तसेच व्यवहाराच्या ४८ तासांत उद्योग संचालनालयाने स्टॅम्प ड्युटी माफ केल्याचा आरोप केला आहे. संबंधित प्रकरण समोर आल्यानंतर आता या प्रकरणात आणखी महत्त्वाची अपडेट समोर आली आहे.

पार्थ पवार संचालक असलेल्या अमेडिया कंपनीवर गुन्हा दाखल होणार असल्याची माहिती समोर येत आहे. मुद्रांक शुल्क विभागाच्या अधिकाऱ्यांनी याबाबत माहिती दिल्याचं वृत्त टीव्ही ९ ने दिलं आहे. मुद्रांक शुल्क विभागाचे सहनोंदणी महानिरीक्षर रवींद्र मुठे यांनी ही माहिती दिली आहे. या प्रकरणात सब रजिस्टरवरही गुन्हा दाखल होणार असल्याची माहिती आहे.

मे २०२५ खरेदी खद नोंदवण्यात आला आहे. यामध्ये जुना सातबारा म्हणजेच बंद झालेला सात बारा देवून खरेद खद नोंदवण्याचा प्रयत्न झाला आहे. याबद्दल संबंधित खरेदी-विक्री करणारे आणि तत्कालीन सब रजिस्टार यांच्याविरुद्ध फौजदारी कारवाई करण्याचा निर्णय झालेला आहे. संबंधित सब रजिस्टर यांना निलंबित करण्याचे आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. ज्यांनी खोटे कागदपत्रे देवून शासनाची फसवणूक केली आहे, तसेच ज्यांनी खोटे कागदपत्रे घेऊन संगनमत केलेलं आहे त्या सर्वांवर फौजदारी गुन्हा दाखल होणार आहे, अशी प्रतिक्रिया सहनोंदणी महानिरीक्षर रवींद्र मुठे यांनी टीव्ही९ला दिली आहे.

### ▶ मुद्रांक शुल्क विभागाची याआधीच नोटीस !

पार्थ पवार यांच्या वादग्रस्त जमीन व्यवहार प्रकरणी अमेडिया होल्डिंग्स एलएलपी कंपनीला आणि मुद्रांक शुल्क विभागाने नोटीस बजावल्याची माहिती समोर आली आहे. स्टॅम्प ड्युटी म्हणजेच मुद्रांक शुल्कची दोन टक्के रक्कम भरण्यासाठी ही नोटीस बजावण्यात आली आहे. अमेडिया कंपनीला दोन टक्के प्रमाणे सहा कोटी रुपये मुद्रांक शुल्क म्हणून भरावे यासाठी नोटीस बजावण्यात आली आहे. पार्थ पवार यांच्या अमेडिया होल्डिंग्स एलएलपी कंपनीने मुद्रांक शुल्कमध्ये सवलत घेत फक्त ५०० रुपये मुद्रांक शुल्क भरले होते. मात्र मुद्रांक शुल्क माफी असली तरी ती फक्त पाच टक्के एवढ्या रकमेसाठी आहे. पुणे शहरांमध्ये एक टक्का एलबीटी आणि एक टक्का मेट्रो सेस म्हणून मुद्रांक शुल्क आकारले जाते. मेट्रोसिस आणि एलबीटी अशी मिळून दोन टक्के मुद्रांक शुल्क याला माफी नाही किंवा सवलत नाही. त्यामुळे ही दोन टक्क्याने होणारी सहा कोटींची रक्कम भरण्यासाठी नोटीस देण्यात आल्याची माहिती आहे.

### ▶ अजित पवारांनी राजीनामा द्यावा ठाकरे गटाचं आंदोलन

दरम्यान, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे कार्यकर्ते आणि पदाधिकारी पुण्यात आक्रमक झाले. ठाकरेंच्या कार्यकर्त्यांनी आज पुण्यात आंदोलन केलं. या आंदोलनात अजित पवार यांनी राजीनामा द्यावा, अशी मागणी करण्यात आली. यावेळी आंदोलकांकडून जोरदार घोषणबाजी करण्यात आली. या आंदोलनावर अजित पवार काय प्रतिक्रिया देतात? ते पाहणं महत्त्वाचं आहे.

## खड्ड्यांनी घेतला तरुणाचा बळी!

**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.०६, चांदवड (नाशिक) :** नाशिक–संभाजीनगर महामार्गावर असंख्य खड्ड्यांमुळे अखेर एका तरुणाचा जीव गेला आहे. चांदवड तालुक्यातील वाकी खुर्द गावातील अनिल बबन जाधव (वय ३४) यांचा गुरुवार, दिनांक ६ नोव्हेंबर रोजी दुपारी ३ वाजून २० मिनिटांच्या सुमारास दुर्दैवी अपघातात मृत्यू झाला.




मिळालेल्या माहितीनुसार, जाधव हे आपल्या दुचाकीवरून नाशिकच्या दिशेने जात असताना महामार्गावरील खोल आणि सलग खड्ड्यांमुळे वाहनाचा ताबा सुटला. त्यात ते गंभीर जखमी झाले. तात्काळ त्यांना लासलगाव येथील समृद्धी हॉस्पिटल येथे उपचारासाठी दाखल करण्यात आले; मात्र उपचारापूर्वीच डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. यानंतर त्यांचे पार्थिव लासलगाव शासकीय रुग्णालयात शवविच्छेदनासाठी नेण्यात आले. या घटनेमुळे वाकी खुर्द तसेच परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. दरम्यान, नाशिक–संभाजीनगर महामार्गाचे काम गेल्या अनेक महिन्यांपासून अतिशय संथ गतीने सुरू असून, रस्त्यावर असंख्य खड्डे पडले आहेत.

या खड्ड्यांमुळे दररोज प्रवाशांचे हाल होत आहेत. संबंधित विभाग आणि ठेकेदार यांच्यावरील निष्काळजीपणामुळे आज एका कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

> “ स्थानिक नागरिकांनी शासन आणि संबंधित विभागाकडे तातडीने महामार्गावरील खड्डे दुरुस्त करून वाहतूक सुरक्षित करण्याची मागणी केली आहे. अन्यथा याच महामार्गावर आणखी जीवितहानीची भीती व्यक्त केली जात आहे.

## निवडणुकीची वारी सुरू... कारभारी सरसावले!

### गावागावात 'रामराम'चा मोसम, मतदार मात्र म्हणतोय काम दाखवा, मगच मत मागा!



**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.०६, विंचूर (नाशिक) :** निफाड तालुक्यात निवडणुकीचे वातावरण तापू लागले आहे. आगामी नगरपालिका, जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राजकीय कारभाऱ्यांनी जनसंपर्काची चढाओढ सुरू केली आहे. कडक इस्त्री केलेले कपडे, गळ्यात फुलांची माळ आणि चेहऱ्यावर गोड हास्य घेऊन हेच नेते आता गावोगावी रामराम ठोकत फिरताना दिसत आहेत. भाऊ-दादांची घराघरांत भेटीगाठी, विचारपूस आणि नमस्काराचा मोसम सुरू झाला असून मतदार मात्र अहो, निवडणुका आल्यात का काय? असा मिश्कील सवाल करत आहेत. गेल्या काही वर्षांपासून प्रलंबित असलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका केव्हाही जाहीर होऊ शकतात. त्यामुळे उमेदवारांची हालचाल वाढली असून सर्वच पक्षातील नेते आणि इच्छुक कार्यकर्ते आता प्रचारयंत्रणा सज्ज करत आहेत.

या निवडणुकांत प्रतिष्ठेचा प्रश्न निर्माण होणार असल्याने गावोगावी तगडी फाईट रंगण्याची चिन्हं आहेत. जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुका म्हणजेच मिनीमंत्रालयच असल्याने उत्साह आणि स्पर्धा दोन्ही भरपूर आहे.

राजकारणात स्वतःची ओळख टिकवण्यासाठी अनेक दिग्गज नेते आणि नवोदित इच्छुक विविध सामाजिक उपक्रमांद्वारे जनतेत सक्रिय झाले आहेत. आम्हीच खरे जनसेवक असा संदेश देण्याचा त्यांचा प्रयत्न सुरू आहे. उमेदवारी मिळो अथवा न मिळो, पण जनसंपर्क आणि शक्तिप्रदर्शनात कोणीही मागे नाही, अशीच सध्याची स्थिती आहे.

परंतु यावेळी मतदार अधिक सजग झाले आहेत. फक्त हात मिळवून आणि वचनं देऊन काही होणार नाही, आधी काम दाखवा मगच मत मागा, अशी ठाम भूमिका मतदारवर्गाने घेतली आहे. विंचूर गट व डोंगरगाव गणात नव्या चेहऱ्यांना आणि काम करणाऱ्यांना संधी द्यावी, अशी मागणी जनतेतून जोर धरत आहे.

## केज तालुक्यात लंपी रोगाने पुन्हा डोके वर काढले !

## आतापर्यंत १९ जनावरांचा मृत्यू !!

### सध्या ७५ जनावरे लंपीग्रस्त ; उपचार आणि लसीकरण मोहिम सुरू...

**अक्षराज : शिवाजी औसेकर**

**दि.०६, केज :** सततचा पाऊस आणि दमट वातावरणामुळे केज तालुक्यात जनावरांमध्ये पुन्हा एकदा लंपी त्वचारोगाचा प्रादुर्भाव वाढू लागला आहे. या आजाराने पुन्हा डोके वर काढले असून, लंपी रोगामुळे पशुधन धोक्यात येत असल्याने पशुपालकांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे.सध्या गायी, कारवड व बैल या जनावरांना लंपी आजाराने जोरीस आणले आहे.

तालुक्यात सरासरी ६० हजार पशुधन असून, त्यापैकी ९० टक्के जनावरांचे लसीकरण पूर्ण झाल्याची माहिती पशुसंवर्धन विभागाने दिली आहे. आतापर्यंत ३२५ जनावरांना लंपीची लागण झाली असून, त्यापैकी २५० जनावरे उपचारानंतर बरी झाली आहेत.

मात्र १९ जनावरांचा मृत्यू झाला आहे. सध्या ७५ जनावरे लंपीग्रस्त असून, त्यांच्यावर पशुवैद्यकीय विभागाकडून उपचार सुरू आहेत. अनेक पशुपालक खासगी डॉक्टरांकडूनही उपचार करून घेत आहेत.



**■ अनुदान बंद; पशुपालकांत संताप**

यापूर्वी लंपी रोगामुळे जनावरांचा मृत्यू झाल्यास शेतकऱ्यांना वासरासाठी ७ हजार रुपये व मोठ्या जनावरासाठी १५ हजार रुपये इतके अनुदान मिळत होते. मात्र सध्या हे अनुदान गतवर्षी पासून बंद करण्यात आल्याने पशुपालकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे.

> ➤ नियमित होत असलेल्या पावसामुळे व वातावरणातील बदलामुळे जनावरांमध्ये लंपी आजाराचा प्रादुर्भाव वाढला असला तरी तो बराही होतो आहे. गोठा स्वच्छ व कोरडा ठेवावा, माशा कमी करण्यासाठी धूर किंवा औषध फवारणी करावी, लंपीग्रस्त जनावरांना वेगळे ठेवावे तसेच नियमित लसीकरण करून घ्यावे
> **- पशुवैद्यकीय अधिकारी डॉ.श्रीकृष्ण थळकरी**
>
> ➤ माझ्या चार गाईंना लंपी रोगाची लागण झाली आहे. त्यांना ताप, सूज तसेच त्वचेवर गाठी येणे अशी लक्षणे दिसून येत असून, त्यांच्या उपचारासाठी आतापर्यंत ४० हजार रुपये खर्च झाला आहे. सरकारने या रोगावर प्रभावी औषधे तरी पुरवावीत. **- ज्ञानेश्वर गव्हाणे, पशुपालक, माळेगाव**

## वासरी शंखतीर्थ रेती घाटावर मोठी कारवाई !

**अक्षराज : साहेबराव गागलवाड**

**दि.६, मुदखेड(नांदेड) :** पोलीस अधीक्षक अविनाश कुमार यांच्या आदेशानुसार ऑपरेशन प्लश अंतर्गत नांदेड जिल्ह्यामध्ये रेती माफिया कडून अवैध मार्गाने रेती उपसा व वाहतूक संदर्भाने कठोर कारवाई करण्याचे आदेश दिले होते त्या अनुषंगाने काही इसम हे वासरी शंखतीर्थ या ठिकाणी अवैध रेती उपसा करीत आहे अशी गुप्त बातमीदारा मार्फत माहिती मिळाल्या वरून आज दि.६ रोज गुरुवारी सकाळी ५ वाजता पोलीस स्टेशन मुदखेड हद्दीत वासरी व शंखतीर्थ या भागात पोलीस व महसूल च्या संयुक्त पथकाने छापा कारवाई करून अवैद्य रेती उपसा करण्यासाठी वापरण्यात येणारी साहित्य १)५ छोट्या गोष्टी प्रत्येकी सात लाख रुपयांच्या अशा ३५,०००,००/२) तीन तराफे किंमत २,००,०००/३) एक रेती उपसा इंजिन किंमत ३,००,०००/ ४) मोठा फायबर किंमत २०,०००,००/ असा एकूण ६०,०००,००/ किमतीचा मुद्देमाल महसूल अधिकारी व पंचाच्या समक्ष जिलेटिनच्या साह्याने उडवून जागी नष्ट करण्यात आला आहे उध्वस्त करण्यात आल्या सदर कारवाई अबिनाश कुमार पोलीस अधीक्षक नांदेड, सुरज गुरव अप्पर पोलीस अधीक्षक नांदेड, अर्चना पाटील अप्पर पोलीस अधीक्षक भोकर, डॅनियल बेन उपविभागीय पोलीस अधिकारी अर्धापूर यांच्या मार्गदर्शनाखाली धीरज चव्हाण पोलीस निरीक्षक मुदखेड आनंद देऊळगावकर मुदखेड तहसीलदार, नायब तहसीलदार मारोतराव जगताप, तलाठी विश्वनाथ बोधमवाड, बाबुराव मुळेकर, राजू चव्हाण, गंगाधर मोरे, शेषराव कोटूरवार, राजकुमार मस्के, गोपाल माने, मनोज वाघमारे सर्व ग्राम महसूल अधिकारी, पोलीस हेड कॉन्स्टेबल अंगद कदम, पोह-कवठेकर, पोकॉ रंजीत वानोळे, पोकॉ- संदीप कारामुंगे, पोकॉ अरविंद सिंगारपुतळे, पोकॉ गणपत बोरकर, महसूल सेवक,सुल्तान पठाण, कोकणे, पोलीस पाटील प्रताप पवार, टील, शुभांगी येडे व भावेश्वर मुंगल हे उपस्थित होते.

अक्षराज






## कॅनडाचा भारताला सर्वात मोठा धक्का




अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या धोरणामुळे जागतिक राजकारणाचा पट बदलला आहे. ट्रम्प यांच्या 'अमेरिका फर्स्ट' विचारामुळे प्रत्येक देश सध्या सर्वच बाबींमध्ये स्वयंपूर्ण होण्याचा प्रयत्न करतोय. उद्योग, रोजगार, तंत्रज्ञान, शिक्षण आदी क्षेत्रात आपल्याच नागरिकांना कशी संधी मिळेल यासाठी प्रत्येकाचा प्रयत्न सुरू आहे. असे असताना आता कॅनडा देशाने चिंता वाढवणारा निर्णय घेतला आहे. या निर्णयाचा भारतावर मोठा परिणाम पडणार असल्याचे बोलले जात आहे.

**कॅनडाने व्हिसासंबंधीच्या नियमांची केली घोषणा...**

मिळालेल्या माहितीनुसार कॅनडाने आपल्या व्हिसा धोरणात महत्त्वाचे बदल केले आहेत. या देशाने इमिग्रेशन लेव्हल्स प्लॅनची (२०२६-२८) घोषणा केली आहे. या धोरणात काही कठोर निर्णय घेण्यात आले आहेत. या धोरणाअंतर्गत कायमस्वरुपी नागरिकांची संख्या स्थिर ठेवण्याचा प्रयत्न करत आहेत. तसेच परदेशी नागरिक आणि तात्पुरते व्हिसा धारकांची संख्यादेखील कमी करण्याचाही प्रयत्न करण्यात आलाय. कॅनडाच्या नव्या धोरणानुसार प्रत्येक वर्षी हा देश ३.८० लाख स्थायी नागरिकांचा स्वीकार करेल. तात्पुरते राहायला आलेल्या लोकांची संख्या मात्र ५ टक्क्यांनी कमी केली जाईल. कॅनडाच्या या धोरणाचा परिणाम त्या देशात शिकायला जाणारे विद्यार्थी आणि कामगारांवर पडेल. याचा विशेष परिणाम भारतावर पडण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

**कॅनडात जाऊन शिक्षण घेणाऱ्यांची संख्या होतेय कमी...**

कॅनडात जाऊन अभ्यास करणाऱ्या परदेशी विद्यार्थ्यांचीही संख्या कमी केली जाणार आहे. या धोरणाअंतर्गत २०२६ साली फक्त १.५५ लाख तर २०२७-२०२८ मध्य फक्त १.५० लाख विद्यार्थ्यांना कॅनडात येऊन शिक्षण घेण्याची परवानगी दिली जाईल. २०२३ सालाच्या शेवटपर्यंत परदेशी विद्यार्थ्यांची संख्या ही १० लाखांपर्यंत पोहोचली होती. २०२४ सालाच्या जानेवारी महिन्यात सरकारने स्टडी परमीटविषयी नियम कडक केले. त्यानंतर कॅनडात जाऊन शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या कमी झाली.

**भारतावर नेमका काय परिणाम पडणार?**

भारतातून कॅनडात अभ्यास करण्यासाठी जाणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रमाण लक्षणीय आहे. आता मात्र कॅनडाच्या नव्या धोरणामुळे कॅडनात जाऊन शिक्षण घेण्यासाठी भारतीय विद्यार्थ्यांना अडचणीचं ठरणार आहे. याआधीच्या उपलब्ध आकडेवारीनुसार भारतीय विद्यार्थ्यांनी कॅनडात जाऊन शिक्षण घेण्यासाठी व्हिसा मिळावा यासाठी अर्ज केला होता. यातील ५० टक्के विद्यार्थ्यांचे अर्ज फेटाळण्यात आले होते. हे प्रमाण आता ८० टक्क्यांवर जाऊन पोहोचले आहे. रॉयटर्सच्या रिपोर्टनुसार ऑगस्ट २०२५ पर्यंत ७४ टक्के भारतीय विद्यार्थ्यांचे व्हिसासाठीचे अर्ज फेटाळण्यात आले. गेल्या वर्षाच्या तुलनेत हे प्रमाण दुप्पट आहे.

कॅनडाचे सरकारने विद्यार्थ्यांना व्हिसा देण्यासाठी कडक नियम केले आहेत. ॲडमिशन लेटर, फसवेगिरी करणारे कागदपत्रं यांची हजारो प्रकरणं समोर आली आहेत. विशेषत: भारत आणि बांगलादेशातून अशा प्रकरणाची संख्या लक्षणीय असल्याचे सरकारचे मत आहे. आता भविष्यात काय होणार, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

# महानायकाचा शाळा प्रवेश दिन....

मित्रांनो आजचा दिवस म्हणजे भारतीय इतिहासातील शिक्षण क्षेत्रातील क्रांतिकारी दिवस होय! ७ नोव्हेंबर विद्यार्थी दिवस! महान शिल्पकार - विद्यार्थी दिवस!! मित्रांनो आज सात नोव्हेंबर शिक्षणाचे शिल्पकार, शिक्षण सम्राट, शिक्षण तज्ञ, शिक्षण तत्त्ववेत्ते, शिक्षणनाचे प्रणेते, शिक्षणाचे क्रांतिकारक, अनाथांचे नाथ, दीन दुबळ्यांचे कैवारी, भारताचे संविधान कर्ते, डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांचा प्रथम शाळा प्रवेश!! म्हणजेच विद्यार्थी दिवस म्हणून ओळखला जातो. आज विद्यार्थी दिवसानिमित्त सर्व विद्यार्थ्यांना खूप खूप हार्दिक शुभेच्छा! तसेच शुभ दीपावली दीपावलीच्याही सर्वांना हार्दिक शुभेच्छा!! शिक्षण हे विकासाचे, प्रगतीचे साधन म्हणून शिक्षणाला महत्त्व देणारे, शिक्षण व पुस्तकावर जिवापाड प्रेम करणारे, पुस्तक म्हणजे जीव की प्राण असणारे, शिक्षण हा माणसाचा तिसरा डोळा मानणारे, डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचा शाळेतील पहिला प्रवेश दिन म्हणजे ७ नोव्हेंबर. हा विद्यार्थी दिवस म्हणून साजरा करण्याचा धाडसी निर्णय घेण्यात आला.




महाराष्ट्र शासनाने २७ ऑक्टोबर २०१७ पासून पूर्ण महाराष्ट्रभर विद्यार्थी दिवस म्हणून साजरा करण्याचा निर्णय घेतला. तेव्हापासून सात नोव्हेंबर हा दिवस विद्यार्थी दिवस म्हणून ओळखला जाऊ लागला. ७ नोव्हेंबर हा ऐतिहासिक दिवस याच दिवशी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचा प्रताप सिंग हायस्कूल सातारा येथे प्रथम शाळा प्रवेश झाला. आणि तोच विद्यार्थी दिवस म्हणून पुढे आला. एक विद्यार्थी बनून जीवनभर शिक्षण क्षेत्रात प्रवास केला. जगाला धर्मनिरपेक्ष, न्याय, स्वातंत्र्य, समता, बंधुता समानता ही मूल्ये शिकविली ते डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी. शिक्षणावर व पुस्तकावर खूप प्रेम केले. अत्यंत गरिबी हालाखीची परिस्थिती. सामाजिक ढवळाढवळीचे दिवस, अशा या संघर्षातून शिक्षण हा केंद्रबिंदू मानून, शिक्षणाशिवाय तरनोपाय नाही असे जाणून त्यांच्या वडिलांनी त्यांना प्रथम शाळेत घातले व हळूहळू शाळेचे गोडी निर्माण झाली. वाचनाचे वेड लागले, वाचनाने खरा माणूस घडतो ही शिकवण त्यांच्या अंगी बानलि व वाचनातूनच ते स्वतः घडले. महान चरित्रांचा अभ्यास केला महान व्यक्तीच्या कार्याचा अभ्यास केला जगातील विद्वान लोकांचे चरित्र वाचले त्यांनी आपल्या जीवनात केलेला संघर्ष वाचला. समाजाला घडवले व देशाला घडवण्याचे मूल्यवान कार्य केले म्हणून आजचा हा दिवस अत्यंत प्रेरणादायी, शिक्षण प्रेमींसाठी, विद्यार्थ्यांना शिक्षण प्रवाहात आणण्यासाठी मोलाचा ठरेल. त्या काळात त्यांनी घेतलेले शिक्षण हे आश्चर्यकारक मानावेच लागेल.

आर्थिक परिस्थिती, सामाजिक परिस्थिती, धार्मिक परिस्थिती, राजकीय परिस्थिती या परिस्थितीला तोंड देत त्यांचा मुकाबला करत त्यांनी विजय प्राप्त केला व यशाचे शिखर गाठले.

त्यांचा धाडसीपणा, त्यांचे चातुर्य त्यांचे, ज्ञान कौशल्य व त्यांच्या कार्यातील प्रामाणिकपणा या गुणामुळेच ते भारतरत्न ठरले!! हा आज आधुनिक काळातील विद्यार्थ्यांना त्यांच्यापासून खूप मोठी प्रेरणा मिळते. जीवन जगण्याची व संघर्षाला तोंड देण्याची कला व धाडस प्राप्त होते म्हणून आधुनिक काळातील विद्यार्थ्यांनी जास्तीत जास्त वाचन करणे अत्यंत गरजेचे आहे. आजचा विद्यार्थी हा भविष्यातील देशाचा आधारस्तंभ आहे. आजचा विद्यार्थी उद्या देश घडविणारा आहे. आजचा विद्यार्थी उद्या देशाचे संरक्षण करणारा आहे. आजचा विद्यार्थी हा उद्या देशावर राज्य करणारा आहे. म्हणून तो प्रामाणिक, चरित्रवान कार्य कुशल, कर्तव्यदक्ष देश प्रेमी, समाज हिताचा विचार करणारा घडला पाहिजे, बनला पाहिजे. वाचाल तर वाचाल असेच म्हणावे लागेल. आजच्या मोबाईल व इंटरनेट युगात पुस्तकांना दुर्लक्षित केले जात आहे. परंतु पुस्तका एवढा चांगला मित्र, पुस्तका एवढा प्रामाणिकपणा, पुस्तकाएवढे खरे ज्ञान इतर कोठूनही मिळणार नाही! म्हणून विद्यार्थ्यांनी ग्रंथालयाशी मैत्री केली पाहिजे. विद्यालयीन व महाविद्यालयीन युवकांनी मोबाईलचे वेड कमी करून पुस्तकांचे वेड लागले पाहिजे.

**आजच्या या विद्यार्थी दिनानिमित्त या महामानवाला व त्यांच्या कार्याला कोटी कोटी विनम्र अभिवादन!**

**- बुद्धभूषण चंद्रकांत कांबळे**
**खंडाळी ता.अहमदपूर जिल्हा लातूर**
**मो.७४९८७१५६६१**

# विद्यार्थी दिन !!

७ नोव्हेंबर हा दिवस संपूर्ण राज्यात विद्यार्थी दिन साजरा केला जातो. याच दिवशी म्हणजे ७ नोव्हेंबर १९०० साली विश्वरत्न महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी प्रतापसिंग हायस्कूल, राजवाडा चौक जिल्हा सातारा येथे शाळेत प्रवेश घेतला होता.

त्यावेळी शाळेत भिवा म्हणून त्यांच्या नावाची नोंद करण्यात आली होती. या शाळेतील जनरल रजिस्टरमध्ये १९१४ या क्रमांकासमोर त्यांच्या नावाची नोंदणी व त्यासमोरील स्वाक्षरी ही ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून आजही शाळा प्रशासनाने जपून ठेवली आहे. या शाळेत ते १९०४ सालापर्यंत म्हणजे चौथी पर्यंत शिकले. ई स २००३ पासून पत्रकार अरुण जावळे हे हा दिवस विद्यार्थी दिन म्हणून साजरा व्हावा यासाठी प्रयत्न करीत होते. २०१७ मध्ये बाबासाहेबांच्या शाळा प्रवेशाचे स्मरण म्हणून तसेच विद्यार्थ्यांना शिक्षण हेच उन्नतीचे एकमेव साधन असून त्याच्या परिश्रमाची जाण व्हावी यासाठी महाराष्ट्र सरकारने हा दिवस विद्यार्थी दिन म्हणून साजरा करण्याचा निर्णय घेतला. या दिवशी राज्यातील सर्व शाळा, महाविद्यालयात डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनावर आधारित विविध पैलूंवर निबंध, वक्तृत्व, काव्य वाचन स्पर्धा आयोजित केल्या जातात. यावर्षी कोरोना आणि दिवाळी यामुळे शाळा, महाविद्यालये बंद असली तरी या स्पर्धा ऑनलाइन आयोजित केल्या जाणार आहेत. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचा शाळा प्रवेश खऱ्या अर्थाने शैक्षणिक क्रांतीची आणि युगाची चाहूल म्हटली पाहिजे.

कारण डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे पाऊल शाळेत पडल्यामुळे ते स्वतः सुशिक्षित आणि प्रज्ञावंत झाले आणि करोडो दलितांचे आणि वंचितांचे उध्दारकर्तेही झाले. विशेष म्हणजे ज्या संविधानाचा आज सर्वात आदर्श संविधान म्हणून देशभर गौरव होत असतो त्या भारतीय संविधानाचे ते शिल्पकारही ठरले. परिणामतः भारतीय समाजात स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय ही मानवी मूल्ये रुजू शकली गेली म्हणूनच डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा शाळा प्रवेश दिन ही अत्यंत महत्वाची आणि इतिहासाला कूस बदलायला लावणारी घटना आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे आजीवन विद्यार्थी होते त्यांनी आपला विद्याव्यासंग शेवटपर्यंत जपला. आजचा विद्यार्थी हा या देशाचे भविष्य आहे. त्यामुळे आदर्श विद्यार्थी निर्माण होणे ही काळाची गरज आहे. जर देशात आदर्श विद्यार्थी निर्माण झाले तर आपल्या देशाला महासत्ता होण्यापासून कोणीही रोखू शकणार नाही. या ऐतिहासिक दिवशी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या पवित्र स्मृतीस विनम्र अभिवादन!

**तसेच सर्व विद्यार्थी मित्रांना विद्यार्थी दिनाच्या हार्दीक शुभेच्छा!**

**- श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

## ही रंगभूमी..

रंगभूमी महोत्सव
सुसंपन्न दिमाखात
स्तुती सुधा पाघळे
गोडवे मुखामुखात

गाजा वाजा दंगला
डंकानाद मुलखात
घरो घरी जाऊ घेऊ
रंग कर्मी मुलाखात

फुलेउत्साह कमळे
सु शोभित आखात
साफ सुथरा दुरुस्त
नाट्य मार्ग उत्खात

नाट्यप्रेमी वळवावे
सकलमाफ जखात
आधीचेप्रस्ताव सर्व
भलेपडले धूळखात

नाट्यपरिक्षण चाले
चर्चाशेंगाखातखात
नाट्य प्रशिक्षण हवे
ठराव करे एकसाथ

नाट्य गृहे उभारावी
आलिशान विख्यात
लिहाकुणी नाटकेही
पुढे ना येती प्रख्यात

**- हेमंत मुसरीफ, पुणे**
**मो.९७३०३०६९९६**

अक्षराज
अचूक वेध अचूक बातमी

## तुझा शाळा प्रवेश

बा भीमा ...
तुझा प्रथम शाळा प्रवेश झाला
अन् ...
मानवी मुक्तीचा निर्गम उताराच कोरला गेला
गुलामीचे साखळदंड गळाले
मनुवादाचे बुरुज ढासळले !

तुझ्या मॅट्रिक पासने दिले स्वाभिमानाचे धडे
अन् ... गेले चातुरवर्णांच्या
उतरंडीला तडे !

तूच ग्रॅज्युएट होणं म्हणजे
काळाराम मंदिराला आली जाग
अन् ... चवदार तळ्यालाही लागली आग !

तुझं पोस्ट ग्रॅज्युएट होणं म्हणजे ...
गोलमेज मध्ये तुझं येणं
अन... गांधीजींचं बाहेर निघून जाणं होतं !

डिलीट बारा अट ला डॉक्टरेट
म्हणजे...
संविधानाचं जनकत्व होतं !
भारत भक्तीचं ममत्व होतं !!

असा लढत लढत शिकलास
शिकत शिकत लढलास
अन् ...गुलामाला निडरपणे...
आत्मसन्मानासाठीच
लढावयाला शिकवलास !!

**- कवी : गीतकार/संगीतकार**
**माधव जाधव**

अक्षराज
अचूक वेध अचूक बातमी

# मुक्रमाबादेत बालाजी मंदिराचा पंचदशम ब्रह्मोत्सव सोहळ्याला सुरुवात...

**अक्षराज : अशोक लोणीकर**

**दि.०६, मुखेड(नांदेड) :** मुखेड तालुक्यातील मुक्रमाबाद येथील बालाजी मंदिराचा पंचदशम् ब्रह्मोत्सव सोहळ्यास प्रारंभ झाला असून गुरुवार दि.०६ ते शनिवार दि.०८ पर्यंत चालणार आहे.

मुक्रमाबाद येथील भगवान श्री लक्ष्मीव्यंकटेशाची मुर्ती प्रतिष्ठापणा सोहळा होवून चौदा वर्ष पूर्ण झाले आहे. त्या निमित्य पंचदशम् ब्रह्मोत्सव सोहळा आयोजित करण्यात आला आहे.

गुरूवार दि.०६ रोजी सकाळी ७ ते १२ वाजेपर्यंत स्वस्ती वाचन, कलशपुजन, पुण्यहवन, विष्णु सहस्त्रनाम पारायण, होम हवन, आरती, तिर्थप्रसाद व किर्तन रात्री ८.३० वाजता किर्तनकार

ह.भ.प.कृ. कांचनताई शिवानंद शेळके समाज प्रयोधनकार व विनोदाचार्य यांचे कीर्तन आयोजित करण्यात आले आहे.

शुक्रवार दि.०७ रोजी सकाळी ७ ते १२ वाजेपर्यंत महाभिषेक, कल्याण उत्सव, झुला उत्सव, विष्णुसहस्त्रनाम पारायण, दिप उत्सव, होम हवन, आरती, तिर्थप्रसाद व किर्तन रात्री ८.३० वाजता. किर्तनकार (भागवताचार्य) ह.भ.प. शिवांजलीताई महाराज जरांगे पाटील मातोरी यांचे कीर्तन आयोजित करण्यात आली आहे. शनिवार दि.८ रोजी सकाळी ११ वाजता श्री ची पालखीतून मिरवणूक काढण्यात येणार आहे. तदनंतर भगवान बालाजींची सामूहिक महाआरती करण्यात येणार असून दुपारी १ ते ५




या वेळेत महाप्रसाद आयोजित करण्यात आला आहे.

शनिवार दि.०८ रोज सकाळी ६ वाजता रावणकोळा येथून निघुन बालाजी मंदीर मुक्रमाबाद पर्यंत श्रीची पालखीतून पायी दिंडी निघणार आहे याची भाविकांनी नोंद घ्यावी.

बालाजी मंदिराच्या ब्रह्मोत्सवानिमित्त तीन दिवस चालणाऱ्या भरगच्च कार्यक्रमाचा, कीर्तनाचा व महाप्रसादाचा लाभ मुक्रमाबाद सह पंचक्रोशीतील भाविकांनी घ्यावा असे अवाहन मंदिराचे अध्यक्ष बंडेप्पा गंदीगुडे व मुख्य पुजारी अर्जुन पंडित शास्त्री यांनी केले आहे.

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

अक्षराज



# थोडक्यात

## संजय केवारी लढविणार वाशाला जिल्हा परिषद गटातून उमेदवारी



**अक्षराज : सुनिल फर्डे**

**दि.०६, शहापूर (ठाणे) :** शहापूर युवा नेतृत्व तसेच सारंगपूरी खैरे ग्रामपंचायत माजी सरपंच संजय केवारी वाशाळा जिल्हा परिषद गटातून उमेदवारी असून सर्वसाम ान्यात मिसळणारे व्यक्तिमत्त्व आहे. शहापूर तालुक्यातील युवा नेतृत्व तसेच सारंगपूरी,खैरे ग्रामपंचायतचे माजी सरपंच संजय केवारी हे सरपंच असल्यामुळे त्यांच्याकडे प्रशासनाचा चांगला अभ्यास आहे. सरपंच असताना त्यांनी ग्रामपंचायत मध्ये चांगल्या प्रकारे योजना सुद्धा राबविल्या असून वाशाला गटात त्याचे खूप मोठ्या प्रमाणात हितसंबंध,नातेसंबंध असल्यामुळे राजकारणाचा दांडगा अनुभव असल्याने वाशाला जिल्हा परिषद गटातून निवडून येऊ शकतात. अशी सर्वसामान्य नागरिकांच्या प्रतिक्रिया ऐकण्यास मिळत आहे. तसेच ते कोणाच्याही सुख दुःखाच्या कार्यामध्ये नेहमी सहभागी असतात. विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटपामध्ये त्यांचा सिंहाचा वाटा असतो. तरुण व प्रौढ वर्गामध्येही संजय केवारीबद्दल आपलेपणाची भावना असल्याने ते वाशाला जिल्हा परिषद गटातून निवडून येण्याची दाट शक्यता असल्याचे समजते.

## ज्ञानोबा माऊलीच्या ७५० व्या जन्मोत्सवनिमित्त अखंड हरिनाम सप्ताहास आजपासून सुरुवात



**अक्षराज : बाळू धायगुडे**

**दि.०६, लोणंद (सातारा) :** संत श्रेष्ठ ज्ञानराज माउलींच्या ७५० व्या जन्मोत्सव निमित्त फलटण खंडाळा तालुका वारकरी संप्रदायाकडून श्री ज्ञानराज माऊली सप्तशतकोत्तर सुवर्ण महोत्सव सोहळा श्री ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण अखंड हरिनाम सप्तहाची फलटण खंडाळा तालुक्यातील हजारो भाविकांच्या उपस्थितीत आज पासून अत्यंत भक्तिमय वातावरणात माऊलींच्या वारीतील पहिले उभे रिंगण साठी लोणंद नजीक प्रसिद्ध असलेल्या चांदोबाचा लिंब येथील ब्रम्हचैत्तन्य गार्डन मंगल कार्यलय येथे सुरवात झाली. गुरवार, दि. ६ नोव्हेंबर २०२५ ते बुधवार, दि.१२ नोव्हेंबर २०२५ पर्यंत होणाऱ्या या ज्ञानेश्वरी पारायण व अखंड हरिनाम सप्तहात राज्यातील प्रसिद्ध नामवंत प्रवचकार आणि कीर्तनकार यांचे प्रवचन आणि कीर्तनाचा लाभ पंचक्रोशीतील सर्व वारकरी भा्विक भक्तांना मिळणार आहे. या उत्सवामध्ये फलटण खंडाळा तालुक्यातील सर्व भजनी मंडळे, गुणीजन गायक, वादक, महाराज वैष्णववृंद, निष्ठावंत वारकरी, सेवक व हितचिंतक सहभागी होणार आहेत. व्यासपीठ चालक ह.भ.प. अनंत महाराज कदम, ह.भ.प.सचिन महाराज महामुनी आणि ह.भ.प.जालिंदर महाराज धायगुडे असणार आहेत. या कार्यक्रमाची सुरवात पहाटे ४ ते ६ काकडा आरती, सकाळी ६:३० ते ७ विष्णू सहस्त्र नाम, सकाळी ८ ते ११ श्री ज्ञानेश्वरी पारायण, दुपारी ११:३० ते १२:३० नियमाचे भजन,सायंकाळी ४ ते ५ प्रवचन, ५ ते ६ हरिपाठ, रात्री ७ ते ९ कीर्तन आणि रात्री ९ ते १०:३० महाप्रसाद असे असून फलटण खंडाळा तालुक्यातील सर्व वारकरी, भाविक भक्तांनी याचा लाभ घ्यावा असे आवाहन ज्ञानराज माऊली परिवाराच्या वतीने करण्यात आले आहे.

## भारताचे गृहमंत्री अमितजी शहा यांना आ. मुनगंटीवार यांनी दिले निमंत्रण



**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि. ०६ चंद्रपूर :** मंत्रीपदाच्या कार्यकाळात चंद्रपूर जिल्ह्याच्या विकासाला वेगळा आयाम देत शिक्षण, रोजगार, कृषी, आरोग्य आणि पायभूत सुविधा या क्षेत्रात दमदार कामगिरी करत विकासाची पंचसूत्री जनतेसमोर ठेवणारे आ. सुधीर मुनगंटीवार यांच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांतून पूर्णत्वास आलेल्या चंद्रपूर येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे लोकार्पण जानेवारी २०२६ मध्ये होणार असून वैद्यकीय शिक्षण व आरोग्य सेवेचे हे प्रशस्त दालन आ. मुनगंटीवार यांच्या पुढाकाराने नववर्षात खुले होणार आहे. या प्रकल्पाच्या लोकार्पण सोहळ्याला उपस्थित राहण्याची विनंती आ. मुनगंटीवार यांनी केंद्रीय गृहमंत्री अमीत शहा यांना केली आहे. या विनंतीला केंद्रीय गृह मंत्री अमित शहा यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला असून लवकरच ते तारीख कळवणार आहे.

चंद्रपूर येथे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय तसेच संलग्न ५०० खाटांच्या अत्याधुनिक रुग्णालयाचे भव्य बांधकाम कार्य पूर्ण झाले आहे. या प्रकल्पासाठी आ. मुनगंटीवार यांनी सातत्याने प्रयत्न केले असून सुमारे रु. ६१६.४६ कोटी इतकी निधी मंजूर करण्यात आला असून एच.एस.सी.सी. (इंडिया) लिमिटेड या संस्थेमार्फत मेसर्स शापूरजी पालनजी कंपनी लिमिटेड यांनी उच्च दर्जामध्ये हे कार्य पूर्ण केले आहे. अर्थमंत्री पदाची धुरा सांभाळल्यानंतर आ. मुनगंटीवार यांनी या प्रकल्पाला गती दिली. निधी वितरणासह शासन स्तरावर तसेच स्थानिक स्तरावर बैठकी घेवून, नियमित आढावा घेवून त्यांनी याकडे विशेष लक्ष दिले. बांधकामाचा दर्जा उच्चतम असावा.

यासाठी ते कायम आग्रही राहिले. या योजनेसाठी माजी मंत्री आ. सुधीर मुनगंटीवार यांच्या प्रयत्नांमुळे सन २०१८-१९ मध्ये रु. ६१.४७ कोटी, सन २०१९-२० मध्ये रु. ११५.०० कोटी, सन २०२०-२१ मध्ये रु. ७५.०० कोटी, सन २०२१-२२ मध्ये रु. १३५.०० कोटी, सन २०२२-२३ मध्ये रु. ७६.०० कोटी, सन २०२३-२४ मध्ये रु. १२४.०० कोटी आणि सन २०२४-२५ मध्ये रु. ३०.०० कोटी असा एकूण रु. ६१६.४६ कोटी निधी वितरित करण्यात आला आहे. हा परिसर १०० एम.बी.बी.एस. विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी तसेच विदर्भ प्रदेशातील नागरिकांना दर्जेदार आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्यासाठी विकसित करण्यात आला आहे. वैद्यकीय शिक्षण, संशोधन आणि उपचार यांच्या दृष्टीने हे संस्थान महाराष्ट्राच्या आरोग्य क्षेत्रात एक नवे पर्व ठरेल असा विश्वास आ. सुधीर मुनगंटीवार यांनी व्यक्त केला आहे.

# न्यायालये केवळ इमारती नसून लोकशाही मूल्यांचे प्रतीक - भारताचे मुख्य न्यायमूर्ती गवई

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.०६, मुंबई :** न्यायालयीन इम ारती या केवळ भव्य नसाव्यात, तर त्या न्याय, समानता, बंधुता आणि स्वातंत्र्य या संविधानातील मूल्यांचे मूर्त रूप असाव्यात. त्या प्रत्येक नागरिकाला न्यायप्रवेश सुलभ करणाऱ्या ठराव्यात, असे प्रतिपादन भारताचे मुख्य न्यायमूर्ती भूषण गवई यांनी केले. उच्च न्यायालयाच्या नवीन संकुलांच्या पायाभरणी आणि कोनशिला अनावरण कार्यक्रम वांद्रे पूर्व येथील शासकीय वसाहत परिसरात पार पडला. या कार्यक्रमास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश चंद्रशेखर, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंह भोसले तसेच न्यायव्यवस्था, प्रशासन आणि पोलीस दलातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.सर्वोच्च न्यायालयाचे मुख्य न्यायम ूर्ती गवई म्हणाले की, न्यायालयीन इम ारतींचे बांधकाम हे केवळ वास्तुशास्त्राचे उदाहरण नसून, त्या देशातील लोकशाही मूल्ये आणि न्यायव्यवस्थेवरील जनतेचा विश्वास टिकवून ठेवणाऱ्या संस्था आहेत. ही इमारत फक्त वास्तू नाही, तर न्याय आणि पारदर्शकतेचे मंदिर आहे. येथे नागरिक, वकील आणि न्यायाधीश या सर्वांना समसमान सुविधा मिळतील. प्रत्येक प्रकल्पामध्ये पर्यावरणपूरक आणि हरित वास्तुकलेचा विचार करण्यात आला आहे.

महाराष्ट्र नेहमीच पायाभूत सुविधांमध्ये अग्रेसर राहिला आहे. राज्य शासनाकडून न्यायव्यवस्थेच्या गरजांनुसार आधुनिक इमारती, तंत्रज्ञान आणि सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहेत. राज्याच्या न्यायसंस्थेचे प्रतीक असलेले एक आधुनिक आणि वैभवशाली बांधकाम असेल, अशा शब्दात त्यांनी उच्च न्यायालयाच्या नवीन संकुलाचे वर्णन केले.मुख्य न्यायमूर्ती गवई यांनी राज्यातील नागपूर, नाशिक आणि छत्रपती संभाजीनगर येथील न्यायालयीन संकुलांचाही उल्लेख केला. त्यांनी सांगितले की, या सर्व प्रकल्पांमुळे न्यायिक प्रक्रियेत पारदर्शकता, गती आणि सुलभता वाढेल. यावेळी त्यांनी महाराष्ट्रातील




उच्च न्यायालयीन न्यायाधीश, वकील संघटना व प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या सहकार्याचेही कौतुक केले. न्यायदान प्रणाली कार्यक्षम होण्यासाठी न्यायाधीश आणि वकिलांनी परस्पर सहकार्याने काम केले पाहिजे. दोन्ही घटक मिळूनच न्यायव्यवस्थेचे सुव्यवस्थापन शक्य होते, असेही त्यांनी सांगितले.मुख्य न्यायमूर्ती गवई यांनी महाराष्ट्र शासनाचे, विशेषतः मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि संबंधित समित्यांचे कौतुक करताना सांगितले की, गतिशील नेतृत्वामुळे न्यायालयीन पायाभूत सुविधा विक्रमी वेगाने उभ्या राहत आहेत. या इमारती नागरिकांसाठी न्याय, समानता आणि बंधुता या राज्यघटनेतील तत्त्वांचे प्रतीक ठरतील.

**लोकशाही मूल्यांचे प्रतिबिंब असलेली भव्य न्यायालयीन इमारत उभारू या – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस**

मुंबईच्या वांद्रे पूर्व येथे उभारण्यात येणारी उच्च न्यायालयाची इमारत केवळ सुंदरच नव्हे, तर देशातील सर्वात जलद आणि स्मार्ट इमारत म्हणून ओळखली जाईल. कृत्रिम बुद्धिमत्ता या तंत्रज्ञानाचा वापर करून ही इमारत पूर्णपणे 'एआय- सक्षम असेल. भविष्यात उच्च न्यायालयाची ही इमारत देशातील इतर न्यायालयांसाठी आदर्श ठरेल, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

या इमारतीचे वैभव हे लोकशाही मूल्यांचे वैभव असले पाहिजे, राजेशाही दिमाखाचे नसावे तसेच ही इमारत जनतेला न्याय मिळण्याचे प्रतीक ठरावी, अशी अपेक्षा मुख्यमंत्री फडणवीस यांनी नव्या न्यायालयीन इमारतीच्या रचनेबाबत वास्तुशिल्पकार हाफिज कॉन्ट्रक्टर यांच्याकडे व्यक्त केली तर उच्च न्यायालयातील अनेक सरकारी वकीलांना पुरेशी जागा आणि आवश्यक सोयी सुविधांचा समावेश असावा, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

**न्याय म्हणजे जनकल्याणाची साधना –**

मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश चंद्रशेखरन्याय म्हणजे केवळ कायद्याचा अंमल नव्हे, तर ती लोककल्याणाची साधना आहे, असे प्रतिपादन मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश चंद्रशेखर यांनी केले. न्यायाची खरी ओळख म्हणजे लोकांच्या हितासाठी कार्य करणे. न्यायालये केवळ प्रकरणे सोडविण्याची ठिकाणे नसून, ती समाजाच्या नैतिकतेचे आणि सामूहिक मूल्यांचे प्रतिबिंब आहेत. न्याय म्हणजे समाजातील प्रत्येक व्यक्तीला समान संधी देण्याचा आणि त्यांच्या हक्कांचे रक्षण करण्याचा प्रयत्न आहे.मुख्य न्यायाधीश श्री चंद्रशेखर म्हणाले की, न्यायसंस्थेची जबाबदारी केवळ आपल्या देशापुरती मर्यादित नसावी. जगभरातील लोक आपल्या न्यायव्यवस्थेतील प्रामाणिकपणा आणि पारदर्शकतेचे कौतुक करावे. समाजातील सर्व घटकांच्या सहकार्याने आपण न्यायाच्या नवीन उंचीवर पोहोचू शकतो. या मार्गावर समाजाचा विश्वास हीच खरी प्रेरणा आहे, असेही त्यांनी सांगितले.

**न्यायव्यवस्था सर्वसामान्य माणसांपर्यंत न्याय पोहोचवणारी व्हावी – उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे**

राज्यघटनेच्या अमृत महोत्सवी वर्षात उच्च न्यायालयाच्या नव्या इम ारतीच्या कामाला प्रारंभ होत आहे, ही बाब अत्यंत आनंदाची असून न्यायव्यवस्था अधिक सक्षम, पारदर्शक आणि सर्वसामान्य माणसापर्यंत न्याय पोहोचवणारी व्हावी, यासाठी हे पाऊल ऐतिहासिक ठरणार आहे, असे प्रतिपादन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले. न्यायव्यवस्थेच्या बळकटीसाठी शासन सदैव कटिबद्ध आहे. न्यायालयीन विषयांबाबत शासनाचा निर्णय क्षणार्धात घेतला जातो, कारण शेवटच्या घटकापर्यंत न्याय मिळावा हेच शासनाचे ध्येय असल्याचे सांगत उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले की, ही नवी वास्तू केवळ न्यायालयाची इम ारत नाही, तर ती न्यायाच्या परंपरेचा आणि लोकशाहीच्या मूल्यांचे प्रतीक आहे. पुढील १०० वर्षांचा विचार करून या प्रकल्पाची आखणी करण्यात आली आहे. मुंबईच्या कायदा आणि न्यायाच्या इतिहासात ही इमारत एक नवा अध्याय लिहिणार आहे. भविष्यात या वास्तूच्या उभारणीसाठी आणि न्यायव्यवस्थेच्या गरजांसाठी शासन कोणतीही तडजोड करणार नसल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

**महाराष्ट्राच्या न्यायव्यवस्थेच्या इतिहासातील नवे पर्व – उपमुख्यमंत्री अजित पवार**

आजचा दिवस हा महाराष्ट्राच्या न्यायव्यवस्थेच्या दृष्टीने अतिशय आनंदाचा, अभिमानाचा आणि ऐतिहासिक आहे. हे उद्घाटन उच्च न्यायालयाच्या १५० वर्षांच्या वैभवशाली इतिहासातील नव्या पर्वाची सुरुवात आहे, असे प्रतिपादन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केले. उपमुख्यमंत्री पवार म्हणाले की, न्याय हा लोकशाहीचा मजबूत पाया आहे. प्रत्येक नागरिकाला समान न्याय मिळण्याचा अधिकार आहे. राज्य शासनाने न्यायप्रविष्ट प्रक्रियेचे विकेंद्रीकरण करण्यासाठी अनेक पावले उचलली आहेत.

कोल्हापूर येथे स्थापन करण्यात आलेला सर्किट बेंच लवकरच कायम बेंचमध्ये रूपांतरित होईल, याची खात्री त्यांनी यावेळी व्यक्त केली.उपमुख्यमंत्री पवार म्हणाले की, भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिप्रेत असलेला 'सामान्य म ाणसापर्यंत न्याय पोहोचवण्याचा' प्रयत्न शासन सतत करत आहे. स्वतंत्र भारतात न्यायव्यवस्था अधिक सुलभ, पारदर्शक आणि तंत्रज्ञानाधारित करण्यासाठी प्रयत्न सुरू आहे. या नवीन संकुलासाठी जेवढा निधी लागेल, तो राज्य शासनाकडून उपलब्ध करून दिला जाणार असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

# चंद्रपूर टायगर सफारी प्रकल्पाला दिल्लीहून हिरवा कंदील

## आ.जोरगेवारांची दिल्ली येथे केंद्रीय प्राणी संग्रहालय प्राधिकरणासोबत सकारात्मक बैठक

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि. ०६ चंद्रपूर :** चंद्रपूरच्या मूल रोडवरील वन अकादमी जवळील १७१ हेक्टर क्षेत्रात प्रस्तावित असलेल्या टायगर सफारी प्रकल्पाला लवकरच केंद्रीय प्राणी संग्रहालय प्राधिकरणाची मंजुरी मिळणार असल्याची माहिती आमदार किशोर जोरगेवार यांनी दिली आहे. गुरुवार, दिनांक ०६ नोव्हेंबर २०२५ रोजी दिल्ली येथे झालेल्या केंद्रीय प्राणी संग्रहालय प्राधिकरणाच्या सदस्य सचिवांसोबत च्या बैठकीत या प्रकल्पाबाबत सकारात्मक चर्चा झाली असून, लवकरच प्राधिकरणाची अधिकृत बैठक घेऊन मंजुरी देण्यात येईल, असे निश्चित झाले आहे. यामुळे चंद्रपूर टायगर सफारीच्या कामांना गती मिळणार आहे.

दिल्ली येथील केंद्रीय प्राणी संग्रहालय प्राधिकरणाच्या कार्यालयात झालेल्या या बैठकीला भारत सरकारचे सदस्य सचिव डॉ. व्ही. क्लेमेंट बेन, महाराष्ट्र राज्य वन्यजीव प्रधान मुख्य वनसंरक्षक श्रीनिवास रेड्डी, तसेच एफडीसीएम गोरेवाडा प्राणी संग्रहालय लिमिटेड नागपूरचे सीईओ चंद्रशेखर बाला उपस्थित होते. आ. किशोर जोरगेवार यांनी या प्रकल्पासाठी सातत्याने पाठपुरावा केला आहे. याआधी त्यांनी राज्याचे वनमंत्री गणेश नाईक यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत हा विषय मांडला होता. वनमंत्री नाईक यांनीही प्रकल्पाला सकारात्मक प्रतिसाद देत निधी वितरण प्रक्रिया गतीमान करण्याचे निर्देश संबंधित अधिकाऱ्यांना दिले होते. त्यानंतर आ. जोरगेवार यांनी नागपूर येथील गोरेवाडा प्राणी संग्रहालयाची पाहणी करून प्रकल्पाच्या आराखड्याची माहिती घेतली होती. चंद्रपूरच्या वन अकादमीच्या जवळ उभारण्यात येणाऱ्या या प्रकल्पासाठी सुमारे ६०० कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित आहे. या प्रकल्पात ऑस्ट्रेलियन, साउथ अमेरिकन, साउथ आफ्रिकन आणि इंडियन ट्रेल अशा विविध थीमवर आधारित प्राणी दर्शन झोन असतील.

पर्यटकांना येथे कांगारू, जग्वार, माकडे, कॅपीबारा, विविध रंगीबेरंगी पक्षी तसेच देशी आणि विदेशी प्राणी पाहता येणार आहेत. याशिवाय ४४ हेक्टर क्षेत्रात वाहन सफारी, २० एकर क्षेत्रात चिल्ड्रन पार्क आणि पर्यटकांसाठी विविध सुविधा निर्माण करण्यात येणार आहेत. दिल्ली येथे केंद्रीय प्राणी संग्रहालय प्राधिकरणासोबत झालेल्या बैठकीत आ. किशोर जोरगेवार यांनी सांगितले की, या प्रकल्पामुळे चंद्रपूर जिल्ह्याच्या पर्यटन क्षेत्रात मोठी झेप मिळेल. केंद्रीय प्राणी संग्रहालय प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांनी बैठकीदरम्यान लवकरच अधिकृत बैठक घेऊन प्रकल्पाला मंजुरी देण्यात येईल असे सांगितले आहे.

विदर्भातील १० वाघांचे होणार



कोल्हापूर येथे पुनर्वसन : आ.किशोर जोरगेवार चंद्रपूर जिल्ह्यासह संपूर्ण विदर्भात गेल्या काही वर्षांपासून म ानव–वन्यजीव संघर्षाची समस्या वाढत चालली आहे. वनक्षेत्रातील वाघांची वाढती संख्या, घटणारे अधिवास क्षेत्र आणि मानव वस्त्यांच्या सीम ारेषा ओलांडणारे वाघ यामुळे अनेक ठिकाणी दुर्दैवी घटना घडत आहेत. या पार्श्वभूमीवर विदर्भातील काही वाघांचे पुनर्वसन करण्याबाबत दिल्ली येथे केंद्रीय प्राणी संग्रहालय प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांसोबत झालेल्या बैठकीत आ. किशोर जोरगेवार यांनी महत्त्वपूर्ण चर्चा केली.

आ. जोरगेवार यांनी या बैठकीत विदर्भातील वाघांची संख्या आणि वाढता मानव–वन्यजीव संघर्ष याबाबत सविस्तर माहिती सादर केली. त्यानंतर सुमारे १० वाघांचे कोल्हापूर येथील सह्याद्री व्याघ्र प्रकल्प येथे पुनर्वसन करण्यासंदर्भात सकारात्मक चर्चा झाली आहे. केंद्रीय प्राणी संग्रहालय प्राधिकरणाचे सदस्य सचिव डॉ. व्ही. क्लेमेंट बेन यांनी या प्रस्तावाबाबत सकारात्मक भूमिका दर्शविली असून लवकरच त्यास मान्यता देण्यात येणार असल्याचे सांगितले.

आ. किशोर जोरगेवार म्हणाले, चंद्रपूरसह विदर्भात वाघांची संख्या झपाट्याने वाढली आहे. त्यातून मानव–वन्यजीव संघर्ष तीव्र झाला असून अनेक जीवितहानी घडत आहेत. या पार्श्वभूमीवर काही वाघांचे नियोजनपूर्वक पुनर्वसन आवश्यक आहे. कोल्हापूर सह्याद्री व्याघ्र प्रकल्पात १० वाघांचे स्थलांतर केल्यास केवळ संघर्ष कमी होणार नाही, तर या वाघांना योग्य पर्यावरणही मिळेल असे म्हटले आहे.

# श्री संताजी शैक्षणिक व सामाजिक विकास संस्था सातारा महाराष्ट्र यांच्यावतीने आर्थिक दुर्बल घटकांना कौटुंबिक साहित्याचे वाटप

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०५, महाबळेश्वर (सातारा) :** महाबळेश्वर तालुक्यातील मौजे गोगवे येथील कातकरी समाजाची वस्ती पवार वस्ती (पाडा) या ठिकाणी श्री संताजी शैक्षणिक व सामाजिक विकास संस्था महाराष्ट्र या संस्थेच्या वतीने या आर्थिक दुर्बल घटकाला कौटुंबिक साहित्याचे वाटप करण्यात आले.






अत्यंत दुर्गम भागामध्ये या समाजाची सोळशी नदीच्या काठावरती वस्ती आहे. हा समाज मासेमारी करणे, जंगलातून मध गोळा करणे, कंदमुळे काढूने त्याच्यावरती आपला उदरनिर्वाह करत असतो. अशा या कठीण परिस्थितीला तोंड देत आपला जीवनक्रम व्यतीत करत असतो. हा समाज आर्थिक आणि सामाजिक विकासापासून फार दूर असून यांना मदतीची नितांत गरज होती. याचा सर्व अभ्यास करून संस्थेच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी या समाजाला (कातकरी समाज) कौटुंबिक साहित्य वाटप करण्याचे ठरविण्यात आले. त्याप्रमाणे गोगवे गावच्या ग्राम पंचायतीला पूर्वकल्पना देऊन कातकरी समाजाच्या कुटुंबाची माहिती घेऊन त्यांना संघटनेच्या वतीने साहित्याचे वाटप करण्यात आले. या ठिकाणी जवळपास ५० कुटुंब राहत असून एकूण २५० च्या आसपास यांची एकूण संख्या आहे.

कातकरी समाजाच्या महिलांनी ही या संधीचा फायदा घेऊन या कार्यक्रमांमध्ये त्या सहभागी झाल्या.

यावेळी गोगवे गावचे सरपंच श्रीयुत भोसले, संघटनेचे अध्यक्ष राम पडघे, उपाध्यक्ष विठ्ठलराव शिरसागर, जिल्हाध्यक्ष संजय शेडगे, महिला अध्यक्ष सुरेखा हाडके, सचिव नामदेवराव झडगे, शिवाजीराव गंधाले, पोपटराव भोज, राजेंद्र हडके, अनिल किरवे, प्रवीण रोकडे, मारुती शिरसागर, निलेश सपकाळ, दिलीप सपकाळ, लता पडगे व श्रीयुत प्रकाश पडगे याशिवाय गोगवे गावचे ग्रामस्थ या कार्यक्रमाला उपस्थित होते.

याशिवाय या कार्यक्रमाला अर्बन बँकेचे उपाध्यक्ष दिलीपराव मोटे यांची आवर्जून उपस्थित होती. त्यांनी यावेळी मनोगत व्यक्त करताना सांगितले की, संघटना अत्यंत उत्कृष्ट काम करत असून या तळागाळातल्या समाजाला मदत करणे हीच खरी ईश्वर सेवा आहे. आपणाला मी आपल्या कार्यासाठी शुभेच्छा देतो.

# थोडक्यात

## ५०० मेट्रिक टन कचरा व्यवस्थापनासाठी ७ बायोमिथेनायझेशन, ४ कंपोस्टिंग प्रकल्पांची कामे जलद गतीने



**अक्षराज : घनश्याम आंबोकर**

**दि.०५, मिरा भाईंदर :** दिनांक ०५ नोव्हेंबर २०२५ सायं ६ वा. परिवहन मंत्री प्रताप सरनाईक ह्यांनी पत्रकार परिषद घेऊन घाण कचरा बाबतीत माहिती दिली. मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या हद्दीत दररोज ४५० ते ५०० मेट्रिक टन घनकचरा तयार होतो. या कचर्यापैकी ओला आणि कोरडा कचरा उत्तन प्रकल्पस्थळी DBFOT पद्धतीने प्रक्रिया केला जातो. याशिवाय, उत्तन येथे ८ टन क्षमतेचा प्लाझ्मा तंत्रज्ञान प्रकल्प पूर्ण झाला आहे. शहरातील कचऱ्याचे विकेंद्रीकरण करण्याच्या उद्देशाने १०० टन क्षमतेचे एकूण ७ बायोमिथेनायझेशन प्लांट्स उभारण्याचे काम सुरू आहे. त्यापैकी ५० टन क्षमतेचे प्रकल्प भायंदर आणि नवघर परिसरात तर उर्वरित ५० टन क्षमतेचे प्रकल्प महाजनवाडी, पेंकरपाडा आणि मिरा क्षेत्रात उभारले जात आहेत.

ओल्या कचऱ्यापासून खत उत्पादनासाठी १०० टन क्षमतेचे ४ सोलाराइज्ड मॅकॅनिकल कंपोस्टिंग प्लांट्स उभारण्यात येत आहेत. त्यापैकी हाटकेश डढझ क्रमांक ०८ येथे २० टन क्षमतेचा प्रकल्प कार्यरत असून उर्वरित ३ प्रकल्पांचे काम जलद गतीने सुरू आहे.

उत्तन प्रकल्पस्थळी उरलेल्या ९,०९,६३०.२० मेट्रिक टन लेगसी वेस्टच्या बायोमइनिंग प्रक्रियेसाठी झअढक, सौराष्ट्र एन्व्हायरो प्रोजेक्ट आणि आकांक्षा एंटरप्राइजेस या तिन्ही संस्थांना ३,०३,२१० मेट्रिक टनप्रमाणे काम सोपविण्यात आले आहे. अलीकडे झालेल्या आढावा बैठकीत कंत्राटदारांना पावसाळ्यापूर्वी बायोमाइनिंगची कामे पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले. या उपक्रमामुळे आगामी काळात उत्तन येथे पोहोचणाऱ्या कचऱ्याच्या प्रमाणात मोठ्या प्रमाणात घट होणार आहे.

# आदिवासी कलाविश्वाची तेजस्वी झळाळी नागपूरच्या मंचावर; पालघरच्या कलाकारांचा डंका

**अक्षराज : निलेश कासट**

**दि.०६, पालघर :** भारतीय आदिवासी संस्कृतीतील परंपरा, लोकनृत्य, आचार-विचार आणि कलांची बहारदार झलक नागपूरमध्ये पाहायला मिळाली. नागपूर येथे नुकताच राष्ट्रीय आदिवासी नृत्य महोत्सव आणिट्रायबल फॅशन शो भव्य उत्साहात संपन्न झाला. महाराष्ट्र, मध्य प्रदेश, छत्तीसगड, झारखंड अशा विविध राज्यांतील ५५ हून अधिक आदिवासी सांस्कृतिक पथकांनी सहभाग नोंदवून आपापल्या संस्कृतीची समृद्ध ओळख देशासमोर साकार केली. या महोत्सवाच्या मंचावर वारली, गावित, कोळी मल्हार, डोंगरी, कोकणी आदिवासी कला, पारंपरिक उत्सव, पीक कापणीच्या विधी, निसर्गपूजाः यांची भावपूर्ण अभिव्यक्ती पाहायला मिळाली. कलाकारांच्या रंगीबेरंगी पोशाखांवर चमकणारे पारंपरिक अलंकार, सुरेल ढोल आणि तारपा वाद्याच्या तालावर सजलेले सामूहिक नृत्य सादरीकरण प्रेक्षकांच्या टाळ्यांचा सतत गजर मिळवत होते.

कार्यक्रमाचे उद्घाटन केंद्रीय आदिवासी व्यवहार मंत्रालयाचे अधिकारी व सांस्कृतिक विभागातील मान्यवर यांच्या हस्ते करण्यात आले. कलाकारांना शाल-श्रीफळ व मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. या राष्ट्रीय स्तरावरील कार्यक्रमात पालघर जिल्ह्याच्या आदिवासी युट्युब कलाकारांनी प्रभावी असा ठसा उमटवला. यात रवि सातपुते, किरण वरठा, पायल वरठे, लक्ष्मी सातवी, सोशल मीडिया इन्फ्लुएन्सर नितीन दिवा आणि आकाश दांडेकर यांनी पालघरचे प्रतिनिधित्व केले. या सर्व कलाकारांनी तारपा नृत्य आणि जागृत आदिवासी सांस्कृतिक पोशाख शैली यांचे अप्रतिम सादरीकरण करून संपूर्ण सभागृहाचे लक्ष वेधून घेतले. त्यांच्या ताल, लय आणि पारंपरिक ओळखीच्या जाणीवेने परीक्षक आणि प्रेक्षक प्रभावित झाले.



फॅशन शो मध्ये पालघरचा डंका - मानाचे किताब पटकावले जय सेवा नागपूरचे प्रफुल धुर्वे यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या ट्रायबल फॅशन शो मध्ये अनेक प्रांतांतील कलाकार सहभागी झाले.

या स्पर्धेत रवी सातपुते यांनी उत्कृष्ट सादरीकरण, व्यक्तिमत्त्व आणि आदिवासी सांस्कृतिक अभिव्यक्तीच्या जोरावर प्रथम क्रमांक पटकावत मिस्टर नागपूर हा मानाचा किताब मिळवला.

तर किरण वरठा यांनी आकर्षक प्रस्तुत आणि शैलीच्या जोरावर तृतीय क्रमांकासह द्वितीय रनरअप पदाचा सन्मान प्राप्त केले. या दोन्ही कलाकारांनी आपल्या कलेच्या माध्यमातून पालघर जिल्ह्याचे नाव राज्य आणि राष्ट्रीय स्तरावर उज्ज्वल केले आहे. डिजिटल युगाने आदिवासी कला जगासमोर नेण्याचे दालन खुले केले आहे. अनेक तरुण कलाकार युट्युब, फेसबुक, इंस्टाग्राम आदी सोशल प्लॅटफॉर्मच्या माध्यमातून आपली कला सादर करून रोजगार आणि आर्थिक स्वावलंबनाचा मार्ग खुला करत आहेत. नागपूर महोत्सवातही या गोष्टीचे विशेष दर्शन घडले. महोत्सवाच्या प्रमुख संयोजकांनी भावना व्यक्त करताना सांगितले.

आदिवासी कला ही भारताच्या सांस्कृतिक वैभवाची मूळ शिदोरी आहे. या कलेचे शिक्षण, संवर्धन आणि परंपरा पुढील पिढीपर्यंत पोहोचण्यासाठी अशा उत्सवांचे आयोजन अत्यंत महत्त्वाचे आहे.

## फुटपाथवरील अनधिकृत बांधकामावर उल्हासनगर महापालिकेची धडक कारवाई



**अक्षराज : विश्वनाथ शेनोय**

**दि.०६, उल्हासनगर (ठाणे) :** उल्हासनगर क्र. ३ येथील लालचक्की सखाराम नगर परिसरात काही व्यक्तींनी रस्त्याच्या फुटपाथवर अनधिकृतपणे बांधकाम केल्याची गंभीर तक्रार स्थानिक नागरिकांकडून उल्हासनगर महानगरपालिका प्रशासनाकडे करण्यात आली होती. या तक्रारीची तात्काळ दखल घेत महापालिका आयुक्त यांच्या आदेशानुसार सहाय्यक आयुक्त गणेश शिंपी यांनी जलदगतीने कारवाई सुरू केली. महापालिकेच्या संबंधित विभागाने घटनास्थळी जाऊन फुटपाथवरील अनधिकृत बांधकामावर तातडीने कारवाई करून ते हटविण्यात आले. या तत्पर आणि प्रभावी कारवाईमुळे परिसरातील नागरिकांनी समाधान व्यक्त करत महापालिका आयुक्त, सहाय्यक आयुक्त गणेश शिंपी तसेच संबंधित विभागातील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचे मनःपूर्वक आभार मानले आहेत.


स्थानिक रहिवाशांनी महापालिकेच्या वेळेवर केलेल्या प्रतिसादाचे कौतुक करत, अशा प्रकारच्या कारवाईमुळे परिसरातील शिस्त, स्वच्छता आणि सार्वजनिक सुव्यवस्था राखण्यास मोठी मदत होईल, असे मत व्यक्त केले. महापालिकेच्या तातडीच्या प्रतिसादामुळे नागरिकांमध्ये विश्वास निर्माण झाला असून, आगामी काळातही अशा अनधिकृत बांधकामांवर नियमित आणि कडक कारवाई होईल, अशी अपेक्षा नागरिकांनी व्यक्त केली आहे.

# शिळफाटा जंक्शन चौकाला स्वराज्यरक्षक छत्रपती संभाजी महाराज यांचे नाव द्यावे

## मनसेने ठाणे आयुक्तांना दिले निवेदन

**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.०६, शिळफाटा (ठाणे) :** ठाणे महानगर पालिका कार्यक्षेत्रातील दिवा प्रभाग समिती अंतर्गत येणाऱ्या शिळफाटा जंक्शन येथील प्रमुख चौकाला स्वराज्यरक्षक छत्रपती संभाजी महाराज यांचे नाव देण्यात यावे, अशी या पंचक्रोशीतील सर्व नागरिक व स्थानिक संस्थांची एकमुखी मागणी आहे.



महाराष्ट्र नवनिर्माण सेना

दिनांकः- 5/11/25

श्री. शरद गुणाजी पाटील
(विभाग अध्यक्ष)

ठाणे महानगरपालिका, ठाणे.
मुख्य कार्यालय
06 NOV 2025
आवक क्र. 7416721
आवक लिपिक

प्रति,
मा. आयुक्त
ठाणे महानगर पालिका,
ठाणे.

विषय: शिळफाटा जंक्शन चौकाला स्वराज्यरक्षक छत्रपती संभाजी महाराज यांचे नाव देण्याबाबत.

सन्माननीय महोदय,

ठाणे महानगर पालिका कार्यक्षेत्रातील दिवा प्रभाग समिती अंतर्गत येणाऱ्या शिळफाटा जंक्शन येथील प्रमुख चौकाला स्वराज्यरक्षक छत्रपती संभाजी महाराज यांचे नाव देण्यात यावे, अशी या पंचक्रोशीतील सर्व नागरिक व स्थानिक संस्थांची एकमुखी मागणी आहे.

उक्त शिळफाटा जंक्शन हा ठाणे, डोंबिवली, नवी मुंबई व पनवेल या महत्त्वाच्या शहरांना जोडणारा अत्यंत गर्दीचा व प्रेक्षणीय ठिकाण आहे. या चौकाचे नामकरण स्वराज्यरक्षक छत्रपती संभाजी महाराज यांच्या नावाने झाल्यास, या मार्गाने प्रवास करणाऱ्या सर्वांना आपल्या राजमुकुटधारी वीर संभाजीराजांच्या पराक्रमाचे आणि त्यागाचे सतत स्मरण होत राहील.

म्हणूनच, स्थानिक नागरिकांच्या भावनांचा आदर राखून व इतिहासातील प्रेरणास्थान ठरलेल्या या महान व्यक्तिमत्वाच्या स्मरणार्थ, सदर चौकाचे नामकरण स्वराज्यरक्षक छत्रपती संभाजी महाराज चौक असे करण्यास मान्यता द्यावी, ही नम्र विनंती.

आपला नम्र,

श्री. शरद गुणाजी पाटील

कार्यालय :- गाळा नं. ०१, गाभारा बिल्डिंग
महाकालेश्वर मंदिर समोर, शिळ दिवा रोड, पडले, ता. जि. ठाणे-४२१२०४.
मो. ९२२०१०१२७३ / ८१०८८४३८४



उक्त शिळफाटा जंक्शन हा ठाणे, डोंबिवली, नवी मुंबई व पनवेल या महत्त्वाच्या शहरांना जोडणारा अत्यंत गर्दीचा व प्रेक्षणीय ठिकाण आहे. या चौकाचे नामकरण स्वराज्यरक्षक छत्रपती संभाजी महाराज यांच्या नावाने झाल्यास, या मार्गाने प्रवास करणाऱ्या सर्वांना आपल्या राजमुकुटधारी वीर संभाजीराजांच्या पराक्रमाचे आणि त्यागाचे सतत स्मरण होत राहील.

म्हणूनच, स्थानिक नागरिकांच्या भावनांचा आदर राखून व इतिहासातील प्रेरणास्थान ठरलेल्या या महान व्यक्तिमत्त्वाच्या स्मरणार्थ, सदर चौकाचे नामकरण स्वराज्यरक्षक छत्रपती संभाजी महाराज चौक असे करण्यास मान्यता द्यावी, असे पत्रक मनसेचे शिळ- देसाई विभाग अध्यक्ष शरद पाटील यांनी ठाणे आयुक्तांना दिले आहे.

## मौजे हेळंब येथे श्री नागबुवा वाचनालयास 'रामलिंगेश्वरचा ज्ञानयात्री' गौरवग्रंथ भेट




**अक्षराज : नीरज मूळे**

**दि.०६, देवणी (लातूर) :** मौजे हेळंब येथील श्री नागाबुवा वाचनालयास जवळग्याचे माजी सरपंच, माजी पंचायत समिती सदस्य तसेच लातूर विभागीय शिक्षण मंडळाचे सदस्य प्राचार्य डॉ.रामलिंग मुळे यांनी दि ०५ नोव्हेंबर २०२५ रोजी वाचनालयास रामलिंगेश्वरचा ज्ञानयात्री या आपल्या शैक्षणिक कार्यावर आधारित ५ गौरवग्रंथ भेट दिले.या भेटीदरम्यान वाचनालयाचे अध्यक्ष तथा सरपंच गुणवंतराव सावंत, शिक्षणमहर्षी वाचनालयाचे सचिव कालिदासराव माने, लाटे गुरुजी, शशिकांत शिंदे, प्रकाश शिंदे, माटेगडीचे माजी सरपंच भगवान सावंत, दयानंद लाटे, महानुरे गुरुजी, निरज मुळे आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी ह.भ.प.रघुवीर महाराज यांना ज्ञानयात्री गौरवग्रंथ देऊन सत्कार करण्यात आला. त्याचप्रमाणे महाराजांनी ज्ञानेश्वरी ग्रंथ प्राचार्य डॉ.रामलिंग मुळे यांना भेट देऊन त्यांचा सन्मान केला.

# नगरपरिषद निवडणूक; जिल्हाधिकाऱ्यांची राजकीय पक्षांच्या पदाधिकाऱ्यांसोबत बैठक

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०६, बुलडाणा :** राज्य निवडणूक आयोगाने नगरपरिषद व नगरपंचायत सार्वत्रिक निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर केला असून त्या अनुषंगाने जिल्ह्यातील राजकीय पक्षांच्या पदाधिकाऱ्यांना माहिती देण्यासाठी आज जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी त्यांच्या कार्यालयात बैठक घेतली.



या बैठकीला अपर जिल्हाधिकारी सुधीर खांदे, निवासी उपजिल्हाधिकारी सदाशिव शेलार, उपजिल्हाधिकारी (निवडणूक) सुहासिनी गोणेवार, मुख्य वित्त व लेखाधिकारी प्रकाश राठोड, जिल्हा सह आयुक्त पेंटे व भाजप, काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस, शिवसेना, रिपाई, राष्ट्रवादी काँग्रेस (श.प.), शिवसेना (उ.बा.ठा.), महाराष्ट्र नवनिर्माण सेना आदी पक्षाचे पदाधिकारी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी यावेळी निवडणूक कार्यक्रमाची माहिती देवून निवडणुक प्रक्रियेची ही संपूर्ण माहिती संभाव्य उमेदवार व नागरिकांपर्यंत पोहचवावी.

मतदार याद्या, निवडणूक आयोगाचे आदेश, सूचनाबाबतची माहिती पुस्तिका जिल्हा प्रशासनाच्या संकेतस्थळावर आणि राज्य निवडणूक आयोगाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले आहे. तसेच नियमांचे पालन करुन निवडणुक प्रक्रिया पार पाडावी, असे आवाहन त्यांनी राजकीय पक्षाच्या पदाधिकाऱ्यांना केले.

## कल्याण येथे आज वंदे मातरम्गीत सामुहीक गायन कार्यक्रमाचे आयोजन

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०६, ठाणे :** बंकिमचंद्र चट्टोपाध्याय लिखीत आनंदमठ या कादंबरीतील असंख्य क्रांतीकारकांना प्रेरणादायी असे वंदे मातरम् या ऐतिहासीक गीतास १५० वर्ष पूर्ण होत आहेत. या गीतास स्वातंत्र्यलढ्यात व स्वातंतत्र्योत्तर कालखंडात अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झाले आहे. या गीतास दि.०७ नोव्हेंबर २०२५ रोजी १५० वर्ष पूर्ण होत असल्याने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनानुसार व सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड.आशिष शेलार व कौशल्य विकास ॲड.मंगलप्रभात लोढा यांच्या संकल्पनेतून वंदे मातरम् गीताचे सामुहिक गायनाचा, तालुकास्तरीय कार्यक्रम कल्याण येथील कै.वासुदेव बळवंत फडके मैदानावर दि.७ नोव्हेंबर २०२५ रोजी सकाळी ९.३० ते १०.३० या दरम्यान आयोजित करण्यात आलेला आहे. हा कार्यक्रम भव्य व दिमाखदार पध्दतीने सपंन्न करावयाचा असल्याने कल्याण व डोंबिवली शहरातील लोकप्रतिनिधी खासदार, आमदार तसेच माजी नगरसेवक या सर्व मान्यवरांना आमंत्रित करण्यात आलेले आहे.